**प्रेसनोट**

प्रेसनोट तक्रारदार यांनी नगर परिषद सार्वत्रीक निवडणुक सन २०२५ मध्ये डेकोरेशन व कॅटरींगची सेवा पुरविली होती, त्याबाबतचे बिल काढुन देण्याच्या मोबदल्यात नगर परिषद कार्यालय तिरोडा येथील नगराध्यक्ष श्री. अशोक असाटी हे ३,२०,०००/-रु. लाचेची मागणी करीत असल्याबाबत दि. ०८.०६.२०२६ रोजी तक्रा दिली होती. त्या तक्रारीवरुन दिनांक ०८.०६.२०२६ चे १६.२० वा ते दिनांक ०९.०६.२०२६ चे १४.०० वा पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान ईलोसे अशोक असाटी, नगराध्यक्ष, नगर परिषद कार्यालय तिरोडा यांनी तक्रारदार यांना त्यांचे तिरोडा नगरपरिषद सार्वत्रीक निवडणुक/२०२५ करीता डेकोरेशन व कॅटरींग सेवा पुरविल्याचे रु.१६,००,०००/- चे बिल काढुन देण्याकरीता पहीले रु.६,००,०००/- चे चेक दिल्याचे मोबदल्यात रु.१,२०,०००/- लाचेची मागणी करुन नंतर रु. १०,००,०००/- चे चेक मिळाल्यावर त्याचे जे होतील ते आणुन देशील अशाप्रकारे लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारण्याची तयारी दर्शविली तसेच श्री कैलाश किसन वाघमारे (खाजगी इसम) यांनी तक्रारदार यांना लाच मागणी पडताळणी दरम्यान लाच देण्याकरीता प्रोत्साहीत केल्याने दोन्ही आरोपी विरुध्द दिनांक १८.०७.२०२६ रोजी पो.स्टे. तिरोडा जि. गोंदिया येथे अप.क्र. ६८९/२०२५ कलम ७,१२ भ्र.प्र.अधि. १९८८, (सुधारित अधिनीयम २०१८) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री निलेश सुरेश लोधी , पोलीस निरीक्षक श्री अरविंद राऊत, श्री उमाकांत उगले, स.फो. चंद्रकांत करपे, पो.हवा. संजयकुमार बोहरे, मंगेश काहालकर, नापोशि संतोष शेंडे, संतोष बोपचे, अशोक कापसे, कैलाश काटकर, प्रशांत सोनवाने, रोहीणी डांगे चालक नापोशि दिपक बाटबर्वे यांनी केलेली आहे. गोंदिया जिल्हयांतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (ऐजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशिर शासकीय शुल्का व्यतिरिक्त लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे संपर्क साधावा. तक्रारदारांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करण्यात येईल व तक्रारदार यांचे सापळा कारवाईत वापरण्यात आलेली रक्कम ही १ महिण्याचे आत परत केल्या जाईल. तसेच तक्रारदारांचे शासकीय विभागात अडकलेले वैध कामही पुर्ण करून दिले जाईल.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा**

**संपर्काचा पत्ता:-** लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया, तिरोडा रिंग रोड, रेल्वे क्रासिंग जवळ गोंदिया पिन ४४१६०१

**संकेत स्थळ**:– acbmaharastra.gov.in

**ईमेल:-** dyspacbgondia@mahapolice.gov.in

**टोल फ्रि क्रमांक** :– १०६४

**दुरध्वनी क्रमांक** :- ०७१८२ २५१२०३

**व्हॉटसअ्प क्रमांक**:- ९२०९०४१०६४, ७६२०३८३८८८

कार्यालय पोलीस उप अधिक्षक अँटी करप्शन ब्युरो गोंदिया
सत्यमेव जयते